# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

जा.क्र.आय/टे.३/चेंजिस इन स्टाफ/ 1077/684 दिनांक: 04 OCT 2021

प्रति,
प्राचार्य,
सर्व संलग्न महाविद्यालये,
व
संचालक मान्यताप्राप्त संस्था

**विषय : 'चेंजिस इन स्टाफ' फॉर्म दंडाबाबत**

संदर्भ : या कार्यालयाची पत्रे क्र. -

१. आय/टे.३/३१५, दि.२२/०७/१९९६
२. आय/टे.५/व्ही/१७६/१९०, दि.०४/०७/१९९८
३. आय/टे.३/४६९/४७६, दि.२०/११/१९९९
४. आय/टे.३/चेंजिस इन स्टाफ/१७, दि.१७/०४/२००१
५. आय/टे.३/चेंजिस इन स्टाफ/५०८०, दि.१४/०९/२००४

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात आदेशानुसार कळविण्यात येते की, संलग्न महाविद्यालयात रितसर विद्यापीठ निवड समितीमार्फत व स्थानिक निवड समिती मार्फत शिक्षकांच्या नेमणुका झाल्यानंतर सदरच्या अहवालांना विद्यापीठाकडुन मान्यता दिली जाते. मान्यता मिळालेले शिक्षक हजर होताच त्यांची माहिती चेंजिस इन स्टाफ फॉर्ममध्ये भरून योग्य ती कागदपत्रे त्याच्या सोबत जोडून अशी प्रकरणे विद्यापीठाकडे पाठवून चेंजिस इन स्टाफ फॉर्मला विद्यापीठाची मान्यता घ्यावी असे वारंवार पत्राद्वारे कळवूनही अनेक महाविद्यालयांनी अशा नियुक्त्यांना मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही. अशा प्रकरणी प्रत्येक वर्षासाठी रू.१०००/- दंडाची आकारणी करून मान्यतेबाबत कार्यवाही केली जाते.

आता दि.२५ ऑगस्ट, २०२१ च्या विद्यापीठ अधिकार मंडळासमोर चेंजिस इन स्टाफ समितीचा अहवाल विचारार्थ सादर केला असता पदवी व पदव्युत्तर स्तरावरील महाविद्यालयातील स्थानिक निवड समिती, विद्यापीठ निवड समिती, तदर्थ मान्यतेवरून नियमित मान्यता, पदोन्नती मान्यता, बदलीनुसार देण्यात येणाऱ्या व इतर सर्व प्रकारच्या चेंजिस इन स्टाफ मान्यता या एक वर्षाच्या आत न घेतल्यास अशा मान्यता देत असताना पूर्वलक्षी प्रभावाने रू.५००/- प्रतीवर्षी दंड आकारण्यात येईल असा निर्णय झाला आहे याची कृपया नोंद घ्यावी. तरी आपल्या महाविद्यालयातील ज्या शिक्षकांचे अद्याप चेंजिस इन स्टाफ फॉर्म पाठवून मान्यता घेतली नसेल त्यांचे फॉर्म परिपूर्ण माहितीसह व योग्य त्या कागदपत्रांसह पाठवून दयावेत. प्रस्तावासोबत रू.१०००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या नावे काढून तो जोडणे आवश्यक आहे. या बाबतीत जर पूर्तता करण्यात आली नाही तर संबधित प्राचार्य त्यासाठी जबाबदार राहतील, याचीही संबंधितानी कृपया नोंद घ्यावी. सदरचे परिपत्रक महाविद्यालयातील सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणावे. सदरचे परिपत्रक हे अधिकार मंडळाचा निर्णय दि.२५ ऑगस्ट, २०२१ नंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावासाठीच लागू राहील. तसेच यापूर्वी अशा प्रकरणामध्ये नियमानुसार भरण्यात आलेल्या दंडाची रक्कम परत केली जाणार नाही. याचीही कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

डॉ. वि. द. नांदवडेकर
कुलसचिव
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

D:\Changes in staff /sub